# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.

दूरध्वनी:०२२-२२१६ ३९६४ / ६५ / ६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६ ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www.mercindia.org.in

MERC

जाहिरात क्र.७/२०१२-१३

## पाहिजेत

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) नव्याने निर्माण झालेली पदे सरळसेवा / प्रतिनियुक्तीच्या तत्त्वावर भरण्यासाठी अर्ज मागवित आहे.**

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | १ | अनुसूचित जाती |
| २. | संचालक (वीज दर) | १ | अनुसूचित जाती |
| ३. | उप संचालक (विधी) | १ | अनुसूचित जमाती |

| अ. क्र. | पदाचे नाव आणि वेतनश्रेणी (रू.) | वय | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | **संचालक (विद्युत अभियांत्रिकी)** (३७,४००-६७,००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | विद्युत अभियांत्रिकी / विद्युत यंत्रणा मधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी. | (अ) नियामक आयोग/विद्युत क्षेत्र/ विद्युत कंपनी/परवानाधारक यामधील किमान १० वर्षांचा अनुभव.<br><br>(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.<br><br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.<br><br>(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता यामध्ये अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |
| २. | **संचालक (वीज दर)** (३७,४००-६७००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | (अ) विद्युत/पॉवर अभियांत्रिकीमधील पदवीबरोबरच एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेतून वित्तीय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापनामधील दोन वर्षांचा एमबीए किंवा सनदी लेखापाल.<br>किंवा<br>(ब) अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी विषयात मास्टर डिग्री किंवा अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापनामध्ये डॉक्टरेट.<br>किंवा<br>(क) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए किंवा सनदी लेखापाल.<br><br>(ड) अर्थशास्त्र / वित्तीय व्यवस्थापन विषयात डॉक्टरेट मिळविणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | (अ) वीज दर निश्चितीकरण प्रक्रियेचा ५ ते ७ वर्षांचा किमान अनुभव;<br><br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br><br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक;<br><br>(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज व्यापार, आणि आर्थिक विश्लेषण करण्याची योग्यता, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | **उप संचालक (विधी)**<br>(१५,६००-३९,१००<br>ग्रेड पे - ७,६००) | उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | मान्यताप्राप्त विद्यापीठ / विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक स्नातक पदवी. | (अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थासारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा, किमान ७ वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधीकरण/मंच, इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक;<br><br>(ब) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान २ वर्षांचा कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती;<br><br>(क) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br><br>(ड) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |

इच्छुकांनी आपले अर्ज संपूर्ण तपशीलासह विहित नमुन्यामध्ये आयोगाचे सचिव यांच्याकडे वरील पत्त्यावर पोस्टाने किंवा कुरीयरमार्फत बुधवार, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१२ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा बेताने पाठवावेत.

अधिक तपशीलासाठी, आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत स्थळाला कृपया भेट द्यावी.

सही/-
(कुलदीप ना.खवारे)
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई

दिनांकः ०३ ऑगस्ट, २०१२